Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl. No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email :- secretary.stateboard@gmail.com

Tel :- Chairman (p) :- STD (020)-25651751 EPABX :-(020)-25705000 Secretary(P) :- (020)-25651750

क्र.रा.म./परीक्षा-८/ ३४०७
पुणे - ४११००४
दिनांक -२७/ ०६/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी )जुलै-ऑगस्ट २०१९ विद्यार्थ्यांची अतिविलंब / विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत ...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.९३ अन्वये जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन परीक्षेची आवेदनपत्र स्विकारण्याची मुदत संपल्यानंतरही (१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाच्या कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या आगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु.१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु.२०० प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ११ फेब्रु २०१३ च्या पत्रानुसार ) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

विलंब शुल्कानंतरची अति विलंब शुल्काची आवेदनपत्रे ही माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in किंवा www.mahasscbaord.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत.

त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची Print Out व दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा | मंगळवार दिनांक ०२/०७/२०१९ ते सोमवार दिनांक ०८/०७/२०१९ | मंगळवार दिनांक ०९/०७/२०१९ ते शुक्रवार दिनांक १२/०७/२०१९ | शनिवार दिनांक १३/०७/२०१९ ते मंगळवार दिनांक १६/०७/२०१९ |

माधितिरण

* विभागीय मंडळाच्या परीक्षा शाखेने प्राप्त शुल्क व ऑनलाईन आलेली आवेदनपत्रे यांची तपासणी करणे आवश्यक आहे.

प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित माध्यमिक शाळा प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षाकेंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट ब) मा. विभागीय अध्यक्ष यांच्या शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरीता पाठविण्यात यावा. मा. **अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबतही सर्व माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात यावे.

माध्यमिक शाळांकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. (उदा. विद्यार्थ्यांचा अर्ज, वैद्यकिय दाखला इ.) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी दिनांक १६/०७/२०१९ पर्यंत घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल. अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्राचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत.

**कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

सोबत- परिशिष्ट 'अ' 'ब' व शुल्क आकारावयाचा तक्ता

सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४.

पृष्ठांकन पत्र क्र.अविमं/माप/652
दि. 28/०६/२०१९

**प्रति,**

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
अमरावती विभाग, अमरावती.

**आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त पृष्ठांकित पत्राची नोंद घेवून शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना अवगत करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**विभागीय सचिव,**
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तवः-

१ मा.सचिव, म.रा.माध्य.व उ.माध्य.शि.मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-०४
२. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
३ शिक्षणाधिकारी(माध्य.) जि.प. अकोला,अमरावती,बुलडाणा,यवतमाळ व वाशिम.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे.

**परिशिष्ट-अ-**

परीक्षेचे नांव ---------------------------------------------

विभागीय मंडळाचे नांव -------------विभागीय मंडळ-------

प्रकणिका क्रमांक ---------------------------------------

**विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस**

**इ.१०वी**

१) विद्यार्थ्याचे नांव ------------------------------------------------------------------------

२) शाळेचे /कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता ------------------------------------------------

३) शाळेचे /कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक ---------------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाही त्याबाबत खालील कारणासमोर( ) खूण करावी.
अ. ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार ब. ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन
क. ( ) नैसर्गिक आपत्ती ड. ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ. ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी /परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.
१)---------------------------------------------२)------------------------------------------
३)---------------------------------------------४)------------------------------------------
५)-----------------------------------------------------------------------------------------

६) शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची शिफारस –
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------

मुख्याध्यापक /प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस-------------ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम---------------------
क) दंड कशा प्रकारे भरला- रोख/धनाकर्ष (डी.डी.)/चलन क्रमांक ------------------------------
ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ---------------------------------------------------------
---------------------------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशिरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ व ९३ मधील तरतूदी नुसार उमेदवारांचा अर्ज स्विकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्याचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नांव व शिक्का.

bulA4.